# संत साहित्यातून प्रकट होणारे पर्यावरण

प्रा.डॉ.जगताप यु.एस
मराठी विभाग प्रमुख, शारदा महाविद्यालय परभणी

आजच्या विज्ञान - तंत्रज्ञान , माहिती, संगणक व इंटरनेटच्या युगात नैसर्गिक पर्यावरण हा शब्दच मोठा परवलीचा झाला आहे. खरे तर निसर्गनिर्मित परिस्थितीला नैसर्गिक पर्यावरण म्हणतात. उदा प्रदेश हवामान, ऋतुचक्र, पाणी, मृदा, वनस्प्ती, पशु-पक्षी, लता-वेली, फुले-फळे इत्यादी घटक हे नैसर्गिक पर्यावरणाचे घटक आहेत पर्यावरणाचे असे हे एकमेकांवर अवलंबून असणे म्हणजेच सुव्यवस्थित निर्सगच होय. परंतु आजच्या 'ग्लोबल वार्मींग' , निसर्गाचा लहरीपणा, जलप्रदुषण, वायुप्रदुषण यामुळे निसर्ग चक्रात बिघाड होऊ लागला आहे तसेच पशु-पक्षांची घटती संख्या व बेसुमार वृक्षतोड यामुळे निसर्ग सृष्टीतील पर्यावरणात असमतोल वाढत चालत आहे याचे परिणाम साहजिकच मानवाला भोगावे लागत आहेत. आजच्या आधुनिकीकरणाच्या काळात पर्यावरण संवर्धन ही काळाचीच गरज आवश्यक झाली आहे.

प्राचीन साहित्यापासून ते आधुनिक मराठी साहित्यात पर्यावरण विषयक विचार जाणिवपूर्वक मांडले गेले आहेत. प्राचीन काळातील सर्वच संतांनी पर्यावरण विषयक विचार आपल्या अभंगातून प्रकर्षाने व्यक्त केले आहेत. १३ व्या शतकात संत ज्ञानेश्वरांनी मूळ भागवतग्रंथातील गीतेवरील रसाळ गिताभाष्य 'ज्ञानेश्वरी' लिहीतांना सर्वसामान्य मानसांना समजेल अशा साध्या सोप्या मराठी भाषेतील वेगवेगळे दृष्टांत देऊन पर्यावरण विचार रूजविण्याचा प्रयत्न केला आहे. अनुभवाची इंद्रियगोचर अनुभूती किंवा प्रचिती व्यक्त करताना संत ज्ञानेश्वर १८ व्या अध्यायात म्हणतात,

'तरी शब्द स्पर्शु । रूप, गंध रसु ।
हा पंचविध अभासु । झेयाचा जो।
जैसे एके चि चूतफळ । इंद्रिया वेगवेगळे ।
रसे वर्णे परिमळे । भेटिजे स्पर्शे।"

आंब्याचे फळ एकच असते परंतु या फळाचे इंद्रिय संवेदन इंद्रियानुरूप वेगवेगळे ठरते. म्हणजेच डोळयांना रंग, जिभेला चव, नाकाला गंध, जाणवतो पण मूळ आंबा एकच असतो. याचा रसास्वाद कसा घ्यावा हे ज्ञानेश्वरांनी सांगितली आहे. म्हणजेच ज्ञानेश्वरांचा आंब्याचा दृष्टांत पर्यावरणानुकूल आहे.

'जैसे शारदियेचे चंद्रकळे । माजी अमृतकण कोवळे ।
ते वेचिती मने मवाळे । चकोर तलगे ।
तिया परी श्रोता । अनुभवावी हे कथा ।
अतिहळूवारपण । चित्ता आणोनिया॥"

शदर ऋतुतील शीतल चांदणे ज्या तन्मयतेने चकोर पक्षाची पिले सेवन करतात त्या तन्मयतेने श्रोत्यांनी ज्ञानेश्वरीचा आस्वाद घ्यावा असे ते सांगतात. ज्ञानेश्वरांनी शरद ऋतु, शीतल

चांदणे चकोर पक्षी या निसर्ग प्रतिमांचा वापर करून निसर्ग किंवा पर्यावरणाचे महत्व येथे नमूद केले आहे. त्याच प्रमाणे 'पैल, तो गे काऊ कोकताहे', 'रूणूझुणू रूणूझूणू रे भ्रमरा 'उड उड रे काऊ कोकताहे', रूणूझूणू रूणूझूणू रे भ्रमरा 'उड उड रे काऊ, तुझे सोन्याने मडविन पाऊ', 'परिमळामध्ये कस्तुरी, पुष्पामध्ये कमळ' अशा किती तरी अभंगातून पर्यावरण विषयक विचार प्रगट झाला आहे.

संत तुकाराम महाराजांनी तर निसर्गाचे मानवी जीवनातील महत्व सांगून पर्यावरण संवर्धनाचा मोलाचा संदेश दिला आहे ते म्हणतात,

'वृक्ष वल्ली आम्हां सोयरी वनचरें । पक्षी ही सुस्वरे आळावे ती
येणे सुखे रूचे एकांताचा वास । नाही गुण दोष अंगा येत ।
आकाश मंडप पृथिवी आसन । रमे तेथे मन क्रीडा करी ॥

तुकाराम महाराज चित्तशुध्दीसाठी निसर्गाच्या सानिध्यात जातात निसर्गाशी एकरूप होऊन जीवनातील दु:ख विसरतात आणि अंतर्मुख होतात. मानवी जीववनातील मानसिक ताण-तणाव निसर्गातील पवित्र रम्य वातावरणामुळे दूर होतात म्हणूनच वृक्ष वल्ली ही आमची सगे सोयरे आहेत असे विचार तुकारामांनी समाजाला दिले.

संतांनी वृक्ष, वल्ली, वर्षा, मेघ, नदी व अरण्ये या सर्व नैसर्गिक घटकांना कधी सिध्दांत, दृष्टांत, उपमा तर कधी रूपक स्वरूपात मांडून 'संत साहित्य पर्यावरण विचार' हे स्वतंत्र दालन उभे केले. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत जनाबाई, संत सावतामाळी, संत चांखामेळा अशा संतांनी समाजाला अभंगाद्वारे निसर्गावर प्रेम करायला शिकवले. 'आनंदाचे डोही आनंद तरंग। आनंदची अंग आनंदाचे' असे मनमोहक आणि विलोभनीय निसर्गच ईश्वराची अनुभुती देतात याची जाणिव तुकारामांनी करून दिली. तर पर्यावरण संवर्धक संतांचा विचार करत असताना समर्थ रामदासांचा आवर्जुन उल्लेख करावा लागतो त्यांनी आपल्या दासबोध ग्रंथात जीवसृष्टी, पर्यावरण यांविषयी सोप्याभाषेत माहिती दिली आहे. पाणी-हवा-पृथ्वी वनस्पती- अन्न-प्राणी जीवसृष्टी असा क्रम समर्थांनी दिला आहे. ते दासबोधात म्हणतात,

'झाडास झाडे खतपाणी । घालुन पाळिली प्रतिदिनी ।
वल्लीमध्ये जळ संचरे । कोरडेपणे ही वावरे ।
वोलेवाचून नाथिरे । काही केल्या। " (दासबोध) किंवा
'नाना खेचरे आणि भूचरे । नाना वनचरे आणि जळचरे ।
नाना वर्ण नाना रंग । नाना जीवनाचे तरंग । येक
सुरंग येक विरंग । येके सुकुमरे येके कठोरे ।
किती म्हणोनि सांगावे । शरीरभेंदे आहारभेंदे वाचाभेदे। (दासबोध)

निसर्ग संवर्धनाने वातावरण, पर्यावरण शुध्द होते असे समर्थांनी त्या काळात सांगितले आहे. संत ज्ञानेश्वरांप्रमाणेच समर्थ रामदासांना चांगलीच जाणकारी होती. त्यांनी संपूर्ण भारतभर तीर्थयात्रा केली होती. आपल्या आयुष्याचा बराच काळ त्यांनी हेळवाक, शिवथर अशा सहयाद्रीतील दुर्गम ठीकाणी वास्तव्य केले होते, रानावनात फिरल्यामुळेच ते स्वत:चा उल्लेख 'दास डोंगरी राहतो' असा करतात.

शिवथर घळीचे वर्णन असलेले 'गिरीचे मस्तकी गंगा। तेथुनि चालली बळे । धबधबा लोटल्या धारा । धबाबां तोथ सगळे । हे समर्थांचे स्फुट काव्य प्रसिध्द आहे. तसेच वर्षाकालीन वनश्री हया काव्यात, "पसरले सरले गिरी साजरे । सरवटे धुकटे' भरिते भरे । बहु वात झाडांच झाडाडितो । वर तरू परतचि कडाडितो।" असे पावसाळयातील निसर्गाचे अप्रतिम वर्णन केले आहे.

समर्थांना पशु, पक्षी, वेली, कीटक वगैरेची चांगलीच ओळख असल्याचे पाहवयास मिळते. समर्थ सज्जनगडावर राहण्यास आले असताना शिवाजी महाराजांनी त्यांना उरमोडी नदीचा काठी सरकारी बागेत एक मठ बांधून दिला तेव्हा तेथे कोणती झाडे असावित यासंबंधी समर्थांनीच त्यांना सूचना दिल्या होत्या. यावरूनसमर्थांचा पर्यावरणाविषयीचा दृष्टीकोण कसा होता हे लक्षात येते.

संत सावतामाळी हे स्वत: माळी होते. त्यामुळे त्यांना शेतमळा पंढरी तर भाजीपाला विठाईच वाटत होती. निसर्ग जीवन प्रत्यक्ष जगणारा हा सावतामाळी निसर्गपूजकही होते. असे प्रकर्षाने जाणवते ते आपल्या अभंगात म्हणतात -

"आमुची माळीयाची जात । शेत लावू बागाईत ॥
आम्हा हाती मोट नाडा । पाणी जाते फुलझाडा ॥
शांति - शेवंती फुलली । प्रेम जाई - जुई व्याली ॥
सावताने केला मळा । विठ्ठल देखियला डोळा॥"
किंवा "कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई डोळा॥ "
लसूण मिरची कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी॥ "

यातून संत सावतामाळी यांना आपल्या बहरणाऱ्या शेतीतुनच पांडूरंगाचे दर्शन घडते. सर्वच संताचा परमानंद म्हणजे भगवंताचे दर्शन घडणे निसर्गातीलसाध्या साध्या गोष्टीतही त्यांना पांडूरंगच दिसतो. त्या मुळेच कावळा कोकलायला लागला की ज्ञानेश्वरांना शुभशकून वाटतो, आपल्याकडे पंढरीचा राणा येणार ही सुखद वार्ता देणाऱ्या कावळयाला ज्ञानेश्वर दही - भात देण्याचे, वाटी भरून दूध देण्याचे, आंबे देण्याचे आणि कावळयाचे पाय सोन्याने मढवण्याचे आश्वासन देतात. खरे म्हणजे कावळया सारख्या सर्वांनी दुर्लक्षीत केलेल्रा पक्षाला आमंत्रण देणारा हा संत सर्व प्राणी मात्रांवर व निसर्गावर प्रेम करायला शिकवणारा आहे. वृक्ष - वेली, वनचरे यांना सोयरे माननारे संत तुकाराम असोत किंवा झाडास खतपाणी घालून झांडांची निगा राखावयास सांगणारे, कोणत्या जागी कोणती झाडे लावावित या संबंधीचा वैज्ञानिक दृष्टीकोण असणारे संत रामदास असोत किंवा शेतीतील मळा फुलविण्याचे तंत्र जोपासणारे सावतामाळी असोत या सर्वच संतांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्व आपल्या साहित्यातून समाजाला पटवून दिले.

**संदर्भ ग्रंथ -**

१. डॉ.यु.म.पठाण, संत साहित्य शोध आणि बोध, दिलिपराज प्रकाशन
२. डॉ. रामचंद्र देखणे, संत साहित्यातील पर्यावरण विचार, पद्मगंधा प्रकाशन
३. शंकर वासुदेव अभ्यंकर, संत तुकाराम, आदित्य प्रकाशन

**संत साहित्यातून प्रकट होणारे पर्यावरण**

प्रा.डॉ.जगताप यु.एस